# प्रकरण ५ भारतीय नौसेना

भारतात इ. स. पूर्व २३०० मध्ये हडप्पा संस्कृतीच्या काळात पहिली गोदी तयार करण्यात आली असे दिसते. ती गुजरात राज्याच्या मंगरोळ बंदराजवळ होती. इ.स.च्या ५ व्या व १० व्या शतकात चोल आणि कलिंगच्या राजांनी आपल्या नौदलाचा विकास करून त्याच्या साहाय्याने मलाया, सुमात्रा आणि पश्चिम जावा (इंडोनेशिया) पर्यंत आपल्या साम्राज्याच्या सीमा वाढवल्या. याच काळात भारतीय उपमहाद्वीपामधून या साम्राज्यांशी व चीनशी व्यापार करण्यासाठी मध्यवर्ती केंद्र म्हणून अंदमान व निकोबार बेटांना महत्त्व होते.

१७ व्या शतकाच्या अखेरीस भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर जंजिऱ्याचा सिद्दी आणि मोगल यांच्यात झालेल्या हातमिळवणीमुळे भारताच्या सागरी हिताला धोका निर्माण झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपले सागरी हित जोपासण्यासाठी सिद्दोजी गुजर व नंतर कान्होजी आंग्रे या दोन आरमार प्रमुखांच्या नेतृत्वाखाली आपल्या आरमाराची उभारणी केली होती. कान्होजी आंग्रे यांनी संपूर्ण कोकण किनाऱ्यावर आपली सत्ता निर्माण करून मराठा आरमार शक्तिशाली बनवले होते. इंग्रज, पोर्तुगीज व डच यांच्याशी त्यांनी यशस्वीपणे झुंजही दिली होती.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय नौसेनेची वाढ झपाट्याने सुरू झाली. आरमाराची उभारणी, त्यात नवनवीन जहाजांचा समावेश करून त्याचे आधुनिकीकरण करणे सुरू आहे. भारतीय नौदलात सध्या विमानवाहू जहाजांपासून पाणबुड्यांपर्यंतच्या सर्व प्रकारच्या लढाऊ जहाजांचा समावेश करण्यात आला आहे.





## भारतीय नौसेनेचे कार्य

❍ **लष्करी कार्य :** नौदलाचे लष्करी कार्य दोन प्रकारचे आहे.

**अ) आक्रमणाच्या वेळेचे कार्य :** नाविक मोहिमेत आक्रमण करतेवेळी शत्रू सैनिक, शत्रू प्रदेश व त्यांचा व्यापार उद्ध्वस्त करणे.

**ब) बचावाच्या वेळेचे कार्य :** नाविक मोहिमेत शत्रूच्या नाविक आक्रमणापासून आपले सैनिक, आपला प्रदेश व व्यापार यांचे रक्षण करणे.

❍ **राजनैतिक कार्य :** भारताची राष्ट्रीय सुरक्षा आणि राष्ट्रहिताची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी किंवा ती जोपासण्यासाठी सागरी वातावरणाची योग्य पद्धतीने निर्मिती करण्याचे कार्य करणे.

❍ **सागरी कायद्यासंबंधीचे कार्य :** भारतीय सागरी सीमा व सागरी प्रदेश यांचे रक्षण करणे, हे भारतीय नौदलाचे प्रमुख कार्य आहे. त्याशिवाय सागरी तस्करांचा, चाच्यांचा आणि दहशतवाद्यांचा बंदोबस्त करणे. त्याकरिता भारतीय नौदल, तट रक्षक दल, राज्य सागरी पोलीस आणि बंदर प्राधिकरण यांची मदत होते. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर सागर किनाऱ्याच्या सुरक्षेची संपूर्ण जबाबदारी नौदलाकडे सोपवण्यात आली आहे.

❍ **नियंत्रण आणि प्रभुत्व :** भारतीय नौसेनेचे मुख्य कार्यालय नवी दिल्ली येथे आहे. नौसेनेचे संपूर्ण नियंत्रण नौसेनाध्यक्ष **(Chief of Naval Staff)** यांचेकडे असते.

## नाविक विभाग (कमांड्स) :

भारतीय नौसेनेचे खालील कमांड्स आहेत. ते त्यांच्या मुख्य कार्यालयातून नेमून दिलेल्या भौगोलिक क्षेत्रातील कार्ये व जबाबदाऱ्या पूर्ण करत असतात. ते कमांड्स पुढीलप्रमाणे –

**अ) पश्चिम नाविक कमांड :** भारताच्या पश्चिमेकडील समुद्र किनाऱ्यावरील गुजरात, महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक राज्यातील बंदरे, नाविक तळ आणि नाविक केंद्रे व त्यावरील जहाजे यांच्या संरक्षणाची जबाबदारी या कमांडची आहे. या कमांडचे मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे.

**ब) पूर्व नाविक कमांड :** भारताच्या पूर्वेकडील समुद्र किनाऱ्यावरील बंगाल, ओरिसा, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू राज्यातील बंदरे, नाविक तळ आणि नाविक केंद्रे व त्यावरील जहाजांच्या संरक्षणाची जबाबदारी या कमांडची आहे. या कमांडचे मुख्य कार्यालय विशाखापट्टणम येथे आहे.

**क) दक्षिण नाविक कमांड :** भारताच्या दक्षिणेकडील केरळ आणि लक्षद्वीप बेटे यातील बंदरे, नाविक तळ व नाविक केंद्रे येथील जहाजे व लढाऊ जहाजे यांचे संरक्षण करणे या कमांडची जबाबदारी आहे. या नाविक कमांडचे मुख्य कार्यालय कोची येथे आहे.

**ड) अंदमान आणि निकोबार संयुक्त विभाग (कमांड):** अंदमान व निकोबार द्वीपसमूहाच्या रक्षणाची जबाबदारी या कमांडची आहे. या कमांडमध्ये स्थलसेना, वायुसेना व नौसेनेच्या सैनिकांची संख्या मोठी आहे म्हणून या कमांडला संयुक्त कमांड असेही म्हणतात. या कमांडचे आधिपत्य तिन्ही सेनादलाचे अधिकारी क्रमाक्रमाने सांभाळतात. या कमांडचे मुख्य कार्यालय पोर्टब्लेयर येथे आहे.

## भारतीय नौसेनेतील जहाजांचे प्रकार

**विमानवाहू जहाज :** विमानवाहू जहाज हे आकाराने व वजनाने मोठे लढाऊ जहाज आहे. या जहाजावर विमानांना उड्डाण करण्याच्या व विमानांना उतरवण्यासाठीच्या सुविधा असतात. तसेच या जहाजावर विमाने असतात म्हणून त्या जहाजाला 'तरंगता हवाईतळ' असे म्हणतात. विमानवाहू जहाज हे गतिमान युद्धातील एक प्रभावी साधन आहे.





**विनाशिका :** विनाशिका हे जहाज अवजड व लांब पल्ल्याच्या विविध शस्त्रास्त्रांनी सज्ज असलेले लढाऊ जहाज आहे. या जहाजांचा आकार हा नाविक दलातील (आरमारातील) विमानवाहू जहाजापेक्षा लहान असतो. त्यावर विमान विरोधी तोफा, लघु पल्ल्याची शस्त्रास्त्रे, शत्रूच्या जहाजावर व जमिनीवर मारा करणारी क्षेपणास्त्रे विमानांच्या किंवा शत्रूच्या क्षेपणास्त्रांच्या विरोधात मारा करणारी मार्गदर्शक क्षेपणास्त्रे, पाणबुडी विरोधात वापरली जाणारी क्षेपणास्त्रे, (टॉरपेडो व डेप्थचार्ज) ही शस्त्रास्त्रे असतात. त्याचबरोबर आपल्या सैनिकांना शत्रूच्या सागर किनाऱ्यावर उतरतेवेळी सुरक्षा व विमानवाहू जहाजास सुरक्षा देण्याचे कार्य विनाशिका करते.

**फ्रिगेट :** फ्रिगेट हे लढाऊ जहाज विनाशिकेपेक्षा आकाराने लहान असते. या जहाजावरही मार्गदर्शक क्षेपणास्त्रे असतात. जहाजावरील इतर शस्त्रास्त्रे व क्षेपणास्त्रांचा उपयोग युद्धाच्या वेळी शत्रूच्या समुद्रकिनाऱ्यावर आणि जहाजांवर मारा करण्यासाठी करतात.





**कॉर्वेट्स :** हे वेगवान व हलक्या शस्त्रास्त्रांनी सज्ज असलेले फ्रिगेटपेक्षा लहान व किनाऱ्यावर गस्त घालणाऱ्या बोटीपेक्षा मोठे जहाज असते. या जहाजाचा उपयोग पाणबुडी विरोधीच्या लढाईत प्रामुख्याने केला जातो.



**माईन स्वीपर :** या जहाजाला पाणसुरुंग विरोधी जहाज म्हणूनही ओळखले जाते. हे लहान जहाज असून शत्रूने समुद्रात पेरून ठेवलेले पाणसुरुंग काढण्याची किंवा त्या पाणसुरुंगांना निकामी करण्यासाठीची यंत्रे यावर असतात.

**लॅन्डींग शिप :** ज्या समुद्र किनाऱ्यावर, बंदरासारख्या सोई सुविधा नसतात, त्याठिकाणी या मोठ्या आकाराच्या जहाजातून वाहने, विविध साहित्य आणि सैनिक यांना वाहून नेऊन समुद्र किनाऱ्यावर उतरवण्याचे कार्य या जहाजाचे असते.





**पॅट्रोल बोट (गस्ती बोट) :** हे नौसेनेतील सर्वात लहान जहाज आहे. त्याचे प्रमुख काम हे समुद्रकिनाऱ्यालगतच्या भागात टेहाळणी करण्याचे असते.

**पाणबुडी :** पाणबुडी हे शत्रुसेनेत सर्वात जास्त भीती निर्माण करणारे अस्त्र आहे. पाणबुडीचा संचार पाण्याखालून असतो. पाणबुडीचे कार्य स्वतंत्रपणे चालते. शत्रूच्या जहाजांचा शोध घेणे व त्याला टॉरपेडो किंवा क्षेपणास्त्राच्या साहाय्याने उद्ध्वस्त करणे हे पाणबुडीचे प्रमुख काम आहे.





**साह्यकारी जहाज :** सागरी मोहिमेत लढाऊ जहाजांना आवश्यकतेनुसार सर्व प्रकारची मदत, सामग्री पुरवण्याचे कार्य ही सहायक जहाजे करत असतात. त्यानुसार त्या जहाजाचा आराखडा बनवण्यात आलेला असतो.

**संशोधन जहाज :** या जहाजांचा उपयोग सागरतळाचे व सागरी मार्गाचे संशोधन करून आपल्या जहाजांची बांधणी व त्यावरील उपकरणे वापरण्यासाठीच्या सूचना देण्याचे कार्य करते.





**प्रशिक्षण जहाज :** नौसेनेतील अधिकारी व नौसैनिकांना सागरी युद्धाचे प्रशिक्षण देण्यासाठी या जहाजाचा उपयोग केला जातो.

या सोबतच नौदलाकडे जमिनीवरून काम करणारी लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर व गस्त विमाने असतात.

## उपक्रम

१. भारतीय नौदलाच्या संदर्भात अंदमान आणि निकोबार बेटे आणि लक्षद्वीप बेटांचे महत्त्व या विषयावर चर्चा करून मुद्दे लिहा.

२) मराठ्यांचे आरमार विकसित करण्यातील कान्होजी आंग्रे यांचे योगदान याबद्दल माहिती घेऊन मुद्दे लिहा.

7X1I4N